परिपत्रक :

मुंबई विद्यापीठ
क्र.वि.क/४३३/२००२

सर्व अधिष्ठाते प्राचार्य कला, वाणिज्य, व विज्ञान, अध्यापक व विधी महाविद्यालये, विज्ञान संस्था तसेच विद्यापीठाचे विविध विभाग प्रमुख यांना असे कळविण्यात येते की. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २०/०७/२००२ व ०१/०८/२००२ रोजी संपन्न झालेल्या सभेत बाब क्रमांक ३५ अन्वये असा ठराव करण्यात आला आहे की, अनुसूचित जमातीच्या राखीव जागावर सरळसेवेने नियुक्त / अथवा पदोन्नत झालेल्या कर्मचारी/ अधिकारी यांना शासकीय / निमशासकीय सेवेत २% आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्रक६८/९४/१६ ब, दिनांक २७ मे २००२ अन्वये निर्गमीत केलेला शासन निर्णय, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या क्र.संकीर्ण-२००२/(२२९/२००२) आस्था-१, दिनांक ४ जून, २००२ द्वारे विद्यापीठाच्या कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला शासन निर्णय स्विकारण्यात यावा.

व्यावस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार सर्व अधिष्ठाते / प्राचार्य / संचालक व विद्यापीठाचे विविध विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येत आहे की, सदर निर्णयावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. शासन निर्णय क्र.बीसीसी-१०९४/प्रक६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२ ची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता सोबत जोडण्यात येत आहे.

मा. [illegible]

प्रभारी कुलसचिवांकरिता

दिनांक : ३ ऑक्टोबर, २००२
मुंबई ४०००३२.

अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळसेवेने नियुक्त/अथवा पदोन्नत झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना शासकीय/निमशासकीय सेवेत २% आरक्षणाबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र-बीसीसी१०९४/प्रक६८/९४/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक २७ मे २००२

संदर्भ
१)शासन निर्णय, सा प्र वि क्र बीसीसी-१०९४/प्रक६८/९४/१६ ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४

२)शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. बीसीसी -१०९४/प्रक६८/९४/१६ब, दिनांक २ जानेवारी, १९९५

३)शासन निर्णय, स. क. सा. का. व की. वि. क्र. सीबीसी -१४९४/प्रक२३६/मावक-५, दिनांक, ७ डिसेंबर, १९९४

४)शासन निर्णय, स. क. सा. का. व की. वि. क्र. सीबीसी -१४९४/प्रक २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५

५)शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. बीसीसी -१०९४/प्रक६८/९४/१६ ब, दिनांक १५ जून, १९९५

-२-

**प्रस्तावना :-** राज्यातील अनु. जाती. आणि अनु. जमाती म्हणून विनिर्दिष्टपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जाती जमाती कडुन सामाजिक, आर्थिकदृष्टया तसेच शैक्षणिकदृष्टया मागासलेपणाच्या कारणावरुन विशिष्ट सवलती देण्याची मागणी सातत्याने होत असते, अशी मागणी अनु जमातींच्या यादीमधील ज्या जमातीचा समावेश करण्यात आलेला आहे, अशा जमातीच्यानावांशी साधर्म्य असणा-या जातीकडुन प्रकर्षाने होत असते. अशा समुदायांमध्ये प्रामुख्याने हलबा कोष्टी, मांच्छमार कोळी, सोनकोळी, मुन्नेरवार, गोवारी आणि माना, यासारख्या जातींचा समावेश आहे याबाबत शासनाने विचार करुन गोवारी, माना, कोष्टी, हलबा-कोष्टी, कोळी, तत्सम जाती, मुन्नेरवार इत्यादी जाती शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व कीडा विभाग, कमांक सीबीसी -१४९४/प्रक२३६/मावक-५, दिनांक, ७ डिसेंबर, १९९४ अन्वये "विशेष मागास प्रवर्ग" म्हणून घोषित केलेला आहे.

या विशेष मागास प्रवर्गासाठी सरळसेवा व पदोन्नतीत २% आरक्षण मध्ये विहित करण्यात आले तसेच अनु जमातींच्या जाती प्रमाणपत्राआधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती मिळविलेली आहे त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येवू नये अथवा पदावनत करण्यात येऊ नये असे आदेश, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, कमांक बीसीसी - १०९४/प्रक६८/९४/१६ ब, दिनांक १५ जून, १९९५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत

अनु जमातींच्या राखीव जागांवर नियुक्त झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी / अधिकारी यांच्या बाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये संरक्षण (प्रोटेक्शन) देताना ही पदे अनारक्षित (डिरिझर्व्ह) करण्यात यावीत व अशा नसलेल्या बिगर आदिवासी / कर्मचारी यांची आदिवासी साठी आरक्षित कोटयांमध्ये गणना करुन नये, अशी महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४० व्या बैठकीत शिफारस करण्यात आली, सदर शिफारस शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४० व्या बैठकीतील शिफारशीवर विचार करुन अनु. जमातींच्या राखीव जागांवर नियुक्त झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांच्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

(अ) ज्या बिगर आदिवासींनी राखीव जागांवर नोकरी किंवा पदोन्नती मिळविल्या त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्यांना त्या घटकात दाखविण्यात यावे व जी रिक्त झालेली पदे आहेत ती आदिवासी जमातींमधून भरण्यात यावीत.

(ब)शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/६/१९९५ च्या परिच्छेद -४ मध्ये देण्यात आलेले संरक्षण दिनांक १५/६/१९९५ च्या आधीलागलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनाच देण्यात यावे.

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचारी / अधिकारी तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगर पालिका, शासकीय उपकम, अनुदानित संस्था, विद्यापीठ, सहकारी बंका, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादिंनाही लागू राहतील.

३. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांच्या तात्काळ निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
बा. क. अग्रवाल
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्रयांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी आधिकारी.
* प्रबंधक उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
* प्रबंधक उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* प्रबंधक लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* प्रबंधक महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,
संचालक समाजकल्याण, पुणे
आयुक्त आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती
* पत्राने

* * * * * * * *

circular.docpg.142.